लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ४५ वा | मंगळवार, दि. ०३ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025




# कृष्णा कुलकर्ण्याची औलाद अजून जीवंत आहे काय ?

**दत्तकुमार खंडागळे**
**9561551006**

राजकोट किल्ल्यावर शिवरायांचा पुतळा छिन्न-निछिन्न अवस्थेत ढासळून पडला. अतिशय भयंकर अवस्थेतलं ते चित्र पाहून तळपायाची आग मस्तकाला गेल्याशिवाय राहिली नाही. सत्तेतल्या हरामखोरांनी भ्रष्टाचाराची विष्ठा शिवरायांच्या पुतळ्यातही खायची सोडली नाही. राजकोट किल्ल्यावरील पुतळ्याचे काम अतिशय सुमार दजार्चे झाले होते यात शंकाच नाही. छत्रपती संभाजी राजेंनी या बाबत आधीच सुचना केल्या होत्या तरीही त्याच्याकडे कानाडोळा करत मोदींच्या हस्ते या पुतळ्याचे उदघाटन केले. शिल्पकलेत शेंबडा म्हणावा अशा लायकीच्या माणसाला सरकारकडून पुतळा निमीर्तीचे काम दिले गेले. सदरचे काम देताना त्याचे कौशल्य न बघता त्याच्या जातीच्या मेरीटवर काम दिले गेले असावे असे वाटते. कारण जसे फडणवीस सत्तेत आलेत तशा सहस्त्र भोजनावळी चालू आहेत. सदर कामात मोठा भ्रष्टाचार झालाय हे उघड आहे. या हरामखोरीची चौकशी व्हायला हवी. खरेतर मुख्यमंत्र्यांना आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना लाज असेल तर त्यांनी राजिनामा द्यावा. आजवर इतक्या वाईट पध्दतीने शिवरायांचा असा अवमान कधीच झाला नव्हता. राजकोटच्या पुतळ्याच्या माध्यमातून तो केला गेला आहे. शिवरायांच्या पुतळ्याचे ते छिन्न-विछिन्न अवस्थेतील तुकडे पाहताना काळजात असंख्य वेदना होत आहेत. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांना लाज असेल तर या लोकांनी महाराष्ट्राची माफी मागायला हवी. या कामात मोठा भ्रष्टाचार झालाच आहे पण त्याही पेक्षा एक भयंकर प्रकार केला गेला आहे. कदाचित हा पुतळा पडला नसता तर ही हरामखोरी शिवभक्तांच्या लक्षात आली नसती.

जयदिप आपटे नावाच्या जातीयवादी संघी भटाने शिवरायांचा पुतळा तयार करताना महाराजांच्या कपाळावरचा वार ठसठशीतपणे दाखवला आहे. हा प्रकार भयंकर आणि विकृत आहे. भारतभर महाराजांचे हजारो पुतळे आहेत पण आजवर ही हरामखोरी कुणीच केली नव्हती. महाराजांच्या कुठल्याच पुतळ्यावर कृष्णा कुलकण्यार्ने केलेल्या तलवारीचा घाव दाखवला गेला



नाही. अफझल खानाचा कोथळा काढला तेव्हा कृष्णा कुलकर्ण्याने शिवाजीराजांच्यावर तलवारीचा वार केला होता. त्या हरामखोराच्या तलवारीचा वार आजवर कुठल्याच शिल्पात दाखवला नव्हता. राजकोट किल्ल्यावर जो पुतळा पडला त्या पुतळ्यात सदरचा घाव दाखवण्यात आला होता. या जातीयवादी शिल्पकाराने महाराजांच्या शरिरावरचे बारकावे टिपले आहेत असे कुणी म्हणेल तर ते योग्य नाही. याच भडव्याने परशूरामाचा एक पुतळा तयार केला आहे त्यात परशूरामाचे शरिर आखीव-रेखीव दाखवले आहे. त्याच्या दंडाच्या बेंडकुळ्या, ट्रायसेफ,बायसेफ दाखवले आहेत. व्यायामाने गच्च फुगलेली छाती दाखवली आहे. त्याच्या अंगावरच्या शिरा दाखवल्या आहेत. पण महाराजाचा पुतळा पाहिला तर हाताच्या नळ्या वाटतात. छाती सर्वसामान्य माणसासारखी साधीच वाटते. शिवाजीराजे मोठे योध्दे होते. त्यांचे शरिर पिळदारच असणार यात शंका नाही. त्यांची छाती, त्यांचे दंड भरदार आणि पिळदारच असतील. महाराजांची कपडे सैल नव्हती. त्या पेहरावातून महाराजांच्या पिळदार शरिराचे दर्शन होतच असावे. पण या आपटे नावाच्या हरामखोराने महाराजांचे शरिर सर्व-सामान्य माणसासारखेच दाखवले आहे. त्याने जे बारकावे परशूरामाच्या पुतळ्यात दाखवले आहेत ते शिवरायांच्या पुतळ्यात दिसत नाहीत. मग नेमका स्वराज्य द्रोही कृष्णा कुलकर्ण्याने केलेला घावच कसा काय इतक्या ठसठशीतपणे दाखवला आहे? त्या मागे त्याची नक्की माणसिकता काय आहे? त्याला जर बारकावेच दाखवायचे होते तर सरसकट सगळेच बारकावे यायला हवेत. महाराजांची पिळदार छाती, दंडही दिसायला हवे होते. बाकी बारकावे आलेले नाहीत आणि शिवरायांच्या कपाळावरची एका ब्राम्हणाने केलेली जखमच कशी काय दाखवली गेली आहे ? नेमका तोच बारकावा का टिपला गेला आहे? आजवर अनेक मात्तबर शिल्पकार झालेले आहेत. त्यांच्या कलाकृती नितांत सुंदर आहेत. त्या कलाकृतींना कधीच जातीचा वास आलेला नाही. या देशात शिवरायांचे हजारो पुतळे तयार केले गेले आहेत. पण अशा पध्दतीची जातीयवादी नालायकी करण्याची हिम्मत कुणीच केली नव्हती. जयदिप आपटे नावाच्या भटानेच ती करावी हा योगायोग कसा समजायचा? तो ही, "इदं न ममं" म्हणणारा, संघाची पैदास असणाराच कसा असावा? हा नक्कीच योगायोग नाही. या निमित्ताने एक बाब समोर आली की या राज्यात अजूनही कृष्णा भास्कर कुलकर्ण्याची औलाद जीवंत आहे. त्यांना अजूनही शिवरायांच्याबद्दल आकस आहे. पण शिवरायांनी स्वराज्यावर चालून आलेल्या अफझुल्याचा कोथळा काढलाच आणि अंगावर चालून येणा-या गद्दार कृष्णा कुलकर्ण्यालां उभा चिरला होता याचे विस्मरण होणे योग्य नाही.

शिवाजी राजांनी आणि संभाजी राजांनी देशात माजलेल्या भटशाहीला नेस्तनाबुत करण्याचा प्रयत्न केला. त्याची अणाजीपंत सारख्यांना चिड होती. त्या चिडीतूनच शिवाजीराजांना व संभाजीराजांना संपवले गेले. संभाजीराजांना इतिहासाच्या पाना-पानावर अतिशय विकृत पध्दतीने चितारले गेले. एका प्रचंड पराक्रमी पुरूषाला बदफैली दाखवले गेले. संभाजी राजांना बदफैली दाखवणारी हिच विकृती आपटेच्या मनात डोकावताना दिसली आहे. त्याने शिवरायांच्या कपाळावरची जखम दाखवताना त्याच्या विषारी मानसिकतेचे दर्शन घडवले आहे. खरेतर शिवरायांच्या कपाळावरची ती जखम प्रत्येक पुतळ्यात दाखवायलाच हवी. ती दाखवू नये असे अजिबात मत नाही. कारण इतिहास हा इतिहास असतो. तो सोईने लिहायचा नसतो, सोईने दाखवायचा नसतो. पण त्या मागचा हेतू शुध्द असण्याची गरज आहे. आपल्या जातीच्या पराक्रमाची निशाणी किंवा जाणीवपुर्वक डिवचण्यासाठी म्हणून इतिहास मांडायचा नसतो. आपटेने जे शेण खाल्ले आहे ते जातीयवादी मानसिकतेतून. स्वराज्यद्रोही कृष्णा कुलकर्ण्याने महाराजांच्या डोक्यात वार केला होता. हे प्रत्येक पिढीला समजायला हवे. अठरा-पगड जाती-जमातीचे, विविध धमार्चे लोक महाराजांसोबत लढत असताना कृष्णा कुलकर्ण्यासारख्या काही औलादी अफझल खानाच्या रक्षणासाठी शिवरायांच्या डोक्यात वार करतात हे बहूजनांच्या पोरांना समजायलाच हवं. वाईच्या भटांनी अफझलखान जिंकावा म्हणून कोटीचंडी यद्न केला होता हे पण समजायला हवं. हिंदुत्वाचे गोडवे गात भटांचे मुत्र पिणा-या बहूजनांच्या येड्या पोरांना ही विकृत मानसिकता कळायला हवी. "हिंदू खतरे मे !" म्हणत अवघ्या देशाला शेंडी लावणा-या या लोकांची कारस्थानी प्रवृत्ती या पोरांना समजायला हवी. ती कळली तर हा देश पुन्हा सुखाने नांदेल.

## ग्रामपंचायती मधील प्लास्टिक कचरा रस्ता बांधकामासाठी बंधनकारक - सिईओ कुलदीप जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गावस्तरावरील प्लास्टिक कचरा रस्ता बांधकामामध्ये वापर या पुढे बंधनकारक असणार आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

जिल्ह्यात सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार, प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर प्लास्टिक साठवण शेड व तालुकास्तरावर प्लास्टिक प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम हाती घेण्यात आली आहेत. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी करण्या साठी सोलापूर जिल्हा परिषदेने प्लास्टिक चा वापर कमी करणे साठी प्रबोधन करणे सुरू केले आहे. याचाच एक भाग म्हणून संकलीत झालेले प्लास्टिक चा



वापर रस्त्याच्या कामात होणे साठी जिल्हा परिषदेचे बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागास लेखी पत्रा द्वारे सिईओ जंगम यांनी सुचना दिले आहेत.

जिल्हात तालुका स्तरावर प्लास्टिक प्रक्रिया केंद्र सुरू करणे साठी प्रक्रिया सुरू आहे. गावस्तरावरील संकलित होणारे व पुनरप्रक्रिया योग्य प्लास्टिक प्रक्रिया अंतर्गत तुकडे करणे, बेल, ग्यानुल बनवणे ची प्रक्रिया सुरू आहे.

पुनर्वापर अंतर्गत प्लास्टिकचा उपयोग रस्ते बांधकामामध्ये करणे अनिवार्य करणेत आले आहे. जिल्ह्यातील तालुकास्तरीय प्रक्रिया केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर संबंधित प्रक्रिया केंद्रातील उपलब्ध प्लास्टिक चा अहवाल स्वच्छ भारत मिशन कक्षात घेऊन जिल्ह्यातील प्लास्टिक डांबरी रस्ते निर्मिती मध्ये वापर होणे साठी नियोजन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यामध्ये प्लास्टिक वापर करून तयार करण्यात आलेले डांबरी रस्ते अहवाल जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षा कडे सादर करणेचे सुचना सिईओ जॅगम यांनी दिले आहेत. या बाबत प्लास्टिक संकलन व प्रकिया करणे साठी क्लस्टर करणेत येत असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी सांगितले.

## सोलापूरात युवा सेनेचे भर पावसात जोडमार आंदोलन

### शिवद्रोही महायुती सरकारचा कडेलोट करणार !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मालवण येथील राजकोट किल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणाला राज्यातील महायुतीचे भ्रष्ट आणि शिवद्रोही सरकारच जबाबदार असून या शिवद्रोही महायुती सरकारचा कडेलोट केल्याशिवाय शिवसेना स्वस्थ बसणार नाही, असा इशारा सोलापूर शहर जिल्हा युवा सेनेच्यावतीने देण्यात आला .

राजकोट किल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळ्यानंतर महाराष्ट्रातील राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. महायुती सरकारच्या विरोधात महाविकास आघाडी सरकारच्यावतीने रविवारी संपूर्ण महाराष्ट्रात जोडे मारो आंदोलनाची हाक देण्यात



आली होती. सोलापुरात शहर - जिल्हा युवासेनेच्यावतीने जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले यांच्या नेतृत्वाखाली

तसेच शहरप्रमुख विठ्ठल वानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी दुपारी चार हुतात्मा पुतळा येथे भर पावसात महायुती सरकारच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करून निषेध नोंदविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज कि जय, जय (पान 2 वर..)

**महायुती सरकारचा अंत करणार**

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्यापासून ते आजच्या महायुती सरकारकडून सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा तसेच महापुरुषांचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. छत्रपती शिवरायांचा पुतळा पडल्यानंतर शिवद्रोही सरकारकडून तर आता महाराष्ट्राचा अंत करण्याचा घाट घातला जात आहे. आगामी काळात शिवद्रोही महायुती सरकारचा अंत केल्याशिवाय शिवसेना गप्प बसणार नाही.शिवभक्त महायुतीच्या नेत्यांना लोणच्यासाठीसुद्धा शिल्लक ठेवणार नाहीत. इतकेच नव्हे तर महायुतीच्या नेत्यांना सोलापुरात सभा आणि जआंदोलन करू देणार नाही.

**- बालाजी चौगुले,** जिल्हाप्रमुख, युवा सेना, सोलापूर

**महायुती सरकारचा भ्रष्ट कारभार कराणीभूत !**

छत्रपती शिवरायांचा पुतळा पडण्यामागे महायुती सरकारचा भ्रस्ट कारभार कारणीभूत आहे. केवळ आठ महिन्यात आणि घाईघाईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उदघाटनाचा इव्हेंट करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा विराजमान करण्यात आला. महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराने छत्रपती शिवरायांनासुद्धा सोडले नाही.त्यामुळे शिवद्रोही सरकारला सत्तेवर राहण्याचा कोणताही अधिकार नाही. सरकारने लवकरात लवकर शिवाजी महाराजांचा पुतळा न उभारल्यास मंत्र्यांना जिल्ह्यात फिरकू देणार नाही.

**- विठ्ठल वानकर,** शहर प्रमुख, युवा सेना, सोलापूर

## आ. बबनराव शिंदे यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव





**बेंबळे (कटूसत्य वृत्त):-** आमदार बबनराव शिंदे यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर सामाजिक, राजकीय, औद्योगिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, वैद्यकीय, प्रशासन आदी क्षेत्रातील मान्यवर, नेतेमंडळी व कार्यकर्ते आणि मित्रमंडळींनी दूरध्वनीवरून, सोशल मीडियाच्या माध्यमातून आणि प्रत्यक्ष भेटून सत्काराद्वारे दिवसभर अक्षरशः शुभेच्छांचा वर्षाव करून त्यांना निरोगी शतायुष्य लाभावे अशी मनोभावे ईश्वरचरणी प्रार्थना केली.

आ. बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त निमगाव (टें) येथील घरी सकाळी त्यांच्या सुविद्य पत्नी कृषिभूषण सुनंदाताई शिंदे यांनी औक्षण करून दीर्घायुष्य लाभो म्हणून ईश्वराकडे प्रार्थना केली. नातेवाईकांनी आ.शिंदे यांचे आशीर्वाद घेतले व शुभेच्छा दिल्या. यावर्षी वाढदिवसानिमित्त मतदारसंघात गावोगावी रक्तदान शिबिरे, माढा येथे नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर, विद्यार्थ्यांना

शैक्षणिक साहित्याचे वाटप, वृक्षारोपण आदी सामाजिक व विधायक उपक्रमांच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करून एक वेगळा आदर्श निर्माण केला.

नेत्र शिबिराचे उद्घाटन व शुभेच्छा स्वीकारण्यासाठी सकाळी नऊ वाजता आ. बबनराव शिंदे माढा येथे उपस्थित राहिले. या ठिकाणी हजारो नागरिकांनी आ. शिंदे यांचा सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. दुपारी १ नंतर आ. बबनराव शिंदे विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याच्या विश्रामगृहावर येऊन थांबले होते. या ठिकाणी भव्य मंडप उभारण्यात आलेला होता. दुपारपासून रात्रीपर्यंत माढा मतदारसंघातील पंढरपूर, माळशिरस सह जिल्हाभरातून व जिल्ह्याच्या बाहेरुन आलेल्या हजारो हितचिंतकांनी अभिनंदन करण्यासाठी व शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. राज्यातील अनेक मान्यवरांनी मोबाईलद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. आ. बबनराव शिंदे यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील पदाधिकारी, मान्यवर, नेते, अधिकारी, महिला भगिनींनी दिवसभर एकच गर्दी केली होती. शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या सर्व नागरिकांच्यासाठी कारखान्यावर गौरव समितीतर्फे भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## सोलापुरात शरद पवारांच्या राष्ट्रवादीत भूकंप

### शहराध्यक्षांचा अवघ्या सहा महिन्यांत राजीनामा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीपूर्वी सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी आपल्या पदाचा अवघ्या सहा महिन्यांत गटबाजीमुळे राजीनामा दिला आहे. सोलापूर शहरात काही



दिवसांपासून राष्ट्रवादीच्या दोन गटांत मोठ्या प्रमाणात कुरबुरी सुरू होत्या. त्यातून तर सुधीर खरटमल यांनी राजीनामा दिला नाही ना ? अशी चर्चा सोलापूर शहरात सुरू आहे.

सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला गेल्या काही दिवसांपासून राजकीय गटबाजीचे ग्रहण लागल्याचे दिसून येत होते. राष्ट्रवादीची 'शिवस्वराज यात्रा' शहरात आल्यानंतर गटबाजी प्रकर्षाने जाणवू लागली. विशेषतः शहराध्यक्षांविरुद्ध माजी महापौर, असे दोन गट सोलापूर शहरात काम करताना दिसून येत होते.

(पान 2 वर..)

## बार्शी बाजार समितीवर तीन सदस्यीय प्रशासकीय मंडळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत संपल्याने बाजार समितीवर तीन सदस्यीय अशासकीय सदस्यांचे प्रशासक मंडळ नेमण्यात आले असून, मुख्य प्रशासकपदी आमदार राजेंद्र राऊत यांचे बंधू विजय राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर अन्य दोन प्रशासकीय सदस्यांमध्ये शाहूराजे निंबाळकर आणि ओंकार



धायगुडे यांचा समावेश आहे.

बार्शी बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत २३ जुलैला संपली. त्यानंतर बाजार समितीची निवडणूक लागण्याची शक्यता होती. पण पावसाळ्यासह अन्य तांत्रिक कारणे देत बाजार समितीची निवडणूक पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर पणन विभागाने प्रशासक मंडळ नेमण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अशासकीय सदस्य म्हणून ११ सदस्यांची नावे निश्चित करण्यात आली. त्यांची जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून पडताळून करण्यात आली. पण त्यापैकी फक्त ३ सदस्यांनाच संधी देण्यात आली. पणन विभागाच्या अवर सचिवांनी या नावांना सहमती दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी यासंबंधीचे आदेश काढले आहेत.

या दरम्यानच्या काळात सहायक निबंधक उमेश पवार यांच्याकडे प्रशासक म्हणून पदभार देण्यात आला होता. त्यांच्याकडून मुख्य प्रशासक विजय राऊत यांच्याकडे आता पदभार देण्यात आला आहे. या वेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. (पान 2 वर..)



# छत्रपती शिवाजी महाराजाचा खरा इतिहास मराठा सेवा संघाने पुढे आणला- इतिहास संशोधक डॉ. चंद्रकांत चव्हाण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजानी हिंदू किंवा मराठ्यामध्येच नव्हे तर मुस्लमानामध्ये देखिल अस्मिता जागृत केली. त्यामुळे स्वराज्याच्या सेवेत असलेल्या मुस्लीम सैनिकांनी महाराजाच्या काळात एक ही बंड अथवा गद्दारी केल्याचे पहावयास मिळत नाही मात्र खरे शिवाजी महाराज समाज समोर आलेच नाहीत मात्र मराठा सेवासंघाने छत्रपती शिवाजी महाराजाचा खरा इतिहास पुढे आणल्याचे विचार इतिहास संशोधन प्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी मांडले

मराठा सेवा संघाचा 34 व्या वर्धापन दिनानिमित्त मराठा सेवा संघ सोलापूर शाखेच्या वतीने समाज बंधावाचा गौरव सोहळा आणि इतिहास संशोधन प्रा.डॉ.चव्हाण

## मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन



यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी आपले विचार व्यक्त करताना चव्हाण बोलत होते. यावेळी विचारपिठावर उत्तमराव माने, डॉ. जे. के. देशमुख, दत्ता मुळे, राजन जाधव, सोमनाथ राऊत, दिनकर देशमुख, नंदा शिंदे, निर्मला शेळवणे, अभिजंली जाधव, उज्वला साळंखे उपस्थित होते.

डॉ. चव्हाण म्हणाले राजकारणी लोक मराठा तरूणांची माथी भडकावून त्यांचा वापर दंगली घडवण्यासाठी करत असत मात्र मराठा सेवा संघाने मोठ्या प्रमाणात मन परिवर्तन करत दगड काठी ऐवजी पुस्तक हाती दिली वाचनसंस्कृती रूजवली त्यामुळे आज काल पुर्ढायांना दगंली घडवण्यासाठी मराठा समाजचे तरूण पुढे येत नाहीत हे मोठे काम मराठा सेवा संघोने आपल्या 34 वर्षाच्या काळ केल्याचे त्यांनी सांगितले

प्रारंभी जिजाऊ वंदना घेण्यात आली. जिल्हाअध्यक्ष डॉ. जी.के देशमुख यांनी प्रास्ताविक करत कार्यक्रम घेण्याची भुमिका विशद केली. त्यानंतर विविध क्षेत्रामध्ये विशेष कामगिरी करर्णाया समाज बांधवाचा वर्धापन दिनाचे औचित्य साधत गौरव करण्यात आला. धुनर्धर साईराज हणमे, धर्मराज चटके, नवीपेठ व्यापारी संघाचे अध्यक्ष विजय मुळिक संपादकपदावर पदोन्नती मिळालेले, प्रशांत माने, प्रा. गणेश देशमुख, पर्यावरण क्षेत्रात काम करणारे महेश देवकर, अभिनव साळुंखे, कृष्णाकांत पवार, पृथ्वीराज चव्हाण, डॉ. अरूण गायकवाड या समाज बांधवाचा गौरव करण्यात आला. प्रशांत माने आणि डॉ. अरूण गायकवाड यांनी सत्कारास उत्तर दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश ननवरे, लक्ष्मण महाडिक, परशुराम पवार, विश्वानाथ गातकवाड, नितीन मोहिते, अंबादास सपकाळे, आर. पी. पाटील, सचिन चव्हाण, श्रीनिवास सावंत, दीपक शेळके यांनी प्रयत्न केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सदाशिव पवार यांनी केले.

# आ. बबनदादा शिंदे यांच्या 73 वाढदिवसानिमित्त तांबवे येथे 77 जणांचे विक्रमी रक्तदान

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** तांबवे तालुका माढा येथे माढा तालुक्याचे भाग्यविधाते आमदार बबन दादा शिंदे यांच्या 73 व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान हे श्रेष्ठदान समजून तीन महिला सह 77 रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरामध्ये सहभाग नोंदवला.



सकाळी ठीक दहा वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन माढा तालुका पंचायत समितीचे सभापती विक्रम दादा शिंदे यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रथमेश पुष्पहार अर्पण करून शुभारंभ करण्यात आला यावेळी युवा नेते यशवंत भैया शिंदे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडू नाना ढवळे,तांबवे गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नागनाथ भाऊ खटके पाटील, माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मा.नागेश (बापू) खटके पाटील, इत्यादी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सोलापूर येथील मल्लिकार्जुन रक्त पेढीने व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून आपली भूमिका व्यवस्थित पार पडली गावातील प्रमुख मान्यवर तरुण व सर्व रक्तदाते उपस्थित होते. उपस्थित संतोष खटके, डॉ मनोज काळे, गोरख खटके, माजी सरपंच बाळासाहेब माने, नितीन खटके उपसरपंच, सुजित खतके माजी उपसरपंच, ॲग्री वरशेर राहुल घाडगे, चीट बॉय जयवंत काळे, पोपट खटके माजी चेअरमन,मंगेश खटके, किरन जाधव,अशोक खटके, विजय खटके, हनुमंत ढवळे, महादेव करंडे, बापू थोरात, मेजर संजय थोरात, गणेश पाटील, अशोक थोरात, कैलास माने,संजय माने, आबा माने, शिवम कोल्हे, हनुमंत भोसले, धनाजी भोसले, कांतीलाल खटके, तात्या देशमुख अमोल लट्ठे, रंजीत खटके, विकास खटके, दीपक भगत संतोष गोडसे,मच्छिंद्र कांबळे,दीपक जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

सौ तेजस्विनी ख, शैला जाधव, सौ राधा जाधव या तीन महिलांनी स्वयंस्फूतीर्ने रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान केले.

# २०२४ ची माढ्याची दहीहंडी तुमच्या साथीने मीच फोडणार - अभिजीत पाटील

## अभिजीत पाटलांचे माढ्यातील दहीहंडी कार्यक्रमात राजकीय वक्तव्य

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढ्यातुन २०२४ ची दहीहंडी देखील तुमच्या साथीने आपणच फोडणार असुन तालुक्याला विकासापासुन वंचित ठेवले असुन माढ्यावरील होणार्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी २०२४ ला माढ्याचे गाठणार असल्याचे वक्तव्य अभिजीत पाटलांनी केले.

अभिजीत पाटील मित्र परिवार यांच्या वतीने माढ्यातील बाजार पटांगण येथे युवाशक्ती दही हंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमावेळी अभिजीत पाटील बोलत होते.या कार्यक्रमास

प्रमुख आकर्षण म्हणून सिनेअभिनेत्री अक्षया देवधर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.माढ्यातील शिवशाही प्रतिष्ठानने हंडी फोडण्याचा मान पटकावत ३१ हजारांचे पारितोषिक व चषक देऊन शिवशाहीचे अध्यक्ष विजय चवरे,निलेश चव्हाण यांच्यासह मंडळाच्या सर्व सदस्यांचा सन्मान करण्यात आला.दहीहंडी उत्सवात झुंजार भांगे युवा मंच,दादासाहेब साठे युवा मंच,दारफळ मित्रपरिवार यासह अन्य मंडळानी सहभाग नोंदवला.



यावेळी अभिजीत पाटील बोलताना पुढे म्हणाले, आपल्या सर्वांच्या साथीने, सर्वांच्या प्रेमाने व आशीवार्दाच्या जोरावर आपणच येणारी २०२४ची विधानसभेची दहीहंडी फोडणार असल्याचे विश्वास ठामपणे व्यक्त करताना राज्यभरात महिला मुलीवर अत्याचाराच्या घटना वाढत असताना प्रत्येक तरुणाने समाजातील परस्रिला मातेसमान समजल्यास अश्या घटनांवर आळा बसेल. यावेळी उपस्थित धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील राजाभाऊ चवरे, आनंदराव कानडे, शहाजी साठे, शिवाजी पाटील, ॲड.धनंजय चव्हाण, शंभू साठे, पंडित साळुंखे, यू एफ जानराव, ॲड.विजय माने, आबासाहेब साठे, निशांत पालकर, भाऊसाहेब महाडिक, अजिंक्य चव्हाण, पोपट आलदर, अच्युत उमाटे, ऋषिकेश तंबीले, संजय तांबिले, सागर बारबोले, शंभु चवरे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक आबासाहेब साठे, जितू जमदाडे, अक्षय शिंदे, सुयश मस्के आदींनी परिश्रम घेतले.

### अक्षया देवधर शी दिव्य मराठीने साधला संवाद

### महिला अत्याचारावर भुमिका मांडणे टाळले

अक्षया देवधर ने कार्यक्रम आटोपल्यानंतर दिव्य मराठीने त्यांच्याशी संवाद साधला. बदलापूर सारख्या घटना समाजात घडत आहेत. याविषयी विचारणा केली असता राज्यभरात महिला मुलीच्या वाढत चाललेल्या अत्याचाराच्या घटनेवर मला बोलायचंच नाही.मला वाटतं हा प्रश्न न विचारलेला बरा. मला काहीच बोलायचंच नाही या विषयावर म्हणत महिला अत्याचाराच्या घटनेविषयी बोलंण अक्षया देवधरने स्पष्टपणे टाळले.

माढ्यात अभिजीत पाटलांच्या दहीहंडीच्या कार्यक्रमाला आलेल्या तुज्यात जीव रंगला फेम अभिनेत्री अक्षया देवधरची झलक पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठी गर्दी.

कार्यक्रमावरुन माघारी गाडीतुन अक्षया देवधर जाताना प्रेक्षकांची हुल्लडबाजी पहायला मिळाली.फोटो साठी गाडीमागे महिला नागरीक धावत सुटल्याचे दिसले.

प्रेक्षकाचे प्रेम मला कायमच अनुभवयाला मिळते.प्रेक्षकांचा प्रतीसाद पाहुन आंनद होतोय.

तुझ्यात जीव रंगला ही मालिका संपुन ४ वर्षे झाली तरी देखील प्रेक्षकांचे अंजलीबाई आणी रानदा वर प्रेम आहे तसेच आहे.अभिनय क्षेत्रात यायला घरच्याचा सपोर्ट असणं फार महत्वाचं असते. महिला अत्याचाराच्या प्रश्नावर अक्षया देवधर यांनी मला काही महिला अत्याचाराच्या प्रश्नावर बोलायचंच नाही असे म्हणत प्रतिक्रिया देणे अक्षया देवधरने टाळले.

# अखेर सोलापूरची विमान सेवा अंतिम टप्प्यात

## सात विमान कंपन्या सेवा देण्याच्या प्रयत्नात, पोलीस बंदोबस्त व अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा सज्ज - डॉ. संदीप आडके

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरील सर्व कामे पूर्ण होऊन येथील विमान सेवा फक्त डीजीसीए यांच्या लायसन्सच्या प्रतीक्षेत आहे. उर्वरित अंतिम कामे पूर्ण करून लवकरात लवकर हे लायसन्स मिळण्याबाबत सोलापूर विचार मंचच्या डॉ. संदीप आडके यांनी नागरी उदयन मंत्रालयाचे मंत्री किनीजारापू नायडू व मुरलीधर मोहोळ, चेअरमन एअरपोर्ट ऑफ इंडिया, डायरेक्ट जनरल डीजीसीए, जनरल मॅनेजर उडान व सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना ३१ ऑगस्ट पर्यंत सोलापूरची विमानसेवा सुरू करण्याबाबत ऑगस्ट महिन्यात सातत्याने पाठपुरावा केलेला होता. डॉ. आडके यांना जानेवारी महिन्यातच प्रधानमंत्री कार्यालयाकडून ही तारीख कळवण्यात आलेली होती. परंतु येथील प्रशासनाच्या व लोकप्रतिनिधींच्या अकार्यक्षमतेमुळे सोलापूरच्या विमानसेवेच्या नुसत्या वेगवेगळ्या तारखा सांगितल्या जायच्या. सप्टेंबर पर्यंत जर ही विमान सेवा सुरू झाली



नाही तर त्याचा आगामी निवडणुकांवर नक्कीच गंभीर परिणाम होईल याबाबत वरील सर्वांना पुन्हा एकदा कळवण्यात आलेले होते त्या अनुषंगाने विमानसेवेबाबतची दिल्लीमध्ये नुकतीच बैठक होऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या विमानतळाच्या देखरेखीसाठी पोलीस अथवा सीआयएसएफ यांचा सुद्धा बंदोबस्त करण्याची मागणी त्यांनी केली होती त्यानुसार पोलिसांच्या एका तुकडीचा बंदोबस्त करण्यात आल्याचे विश्वसनीय रित्या कळाले आहे.

अतिशय अत्याधुनिक अग्निशमन व आपत्कालीन व्यवस्थेसाठीची यंत्रणा विमानतळावर सज्ज झाली आहे.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यातच सोलापूर विचार मंच तर्फे ११ विमान कंपन्यांना विमान सेवा देण्याबाबत सोलापूरचे पॉझिटिव ब्रॅण्डिंग करून आग्रहाचा प्रस्ताव पाठवण्यात आलेला होता. त्यापैकी सात विमान कंपन्या येथे विमान सेवा देण्यासाठी उत्सुक असल्याबाबत सातत्याने आपल्या संपर्कात असल्याचे डॉ. संदीप आडके यांनी सांगितले आहे. सुरुवातीला सोलापुरातून मुंबई, नवी दिल्ली, बेंगलोर, हैदराबाद, गोवा व तिरुपती या ठिकाणी विमानसेवा सुरू करण्याचे प्रस्ताव देण्यात आलेले आहेत.

येथे नाईट लँडिंग फॅसिलिटी सुद्धा सुरू करावी जेणेकरून येथील विमानांना रात्री उशिरा येता येईल व सकाळी लवकर निघता येईल अशी मागणी सुद्धा करण्यात आलेली आहे.

गेल्या अनेक वषार्पासून विमान सेवा सुरू होण्यासाठी सोलापूर विचार मंच तर्फे सातत्याने प्रयत्न करण्यात आलेले होते व त्यास आता यश आलेले दिसत आहे.

# एनटीपीसी सोलापुरात येथे राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एनटीपीसी सोलापूरने राष्ट्रीय क्रीडा दिन- 2024 ला अनेक रोमांचक क्रीडा स्पर्धासह साजरा केला, फिटनेस, टीमवर्क आणि खिलाडूवृत्तीच्या उत्सवात कर्मचारी, त्यांची कुटुंबे आणि स्थानिक समुदायाला उत्सवात एकत्र आणण्यात आले. क्रीडा स्पर्धेचे आयोजन 29 ऑगस्ट२०२४ ते 31ऑगस्ट २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले होते.

क्रीडा दिवसाची सुरुवात CISF संघ आणि एनटीपीसी कर्मचाऱ्यांमधील संघ यांच्यात रोमांचक व्हॉलीबॉल सामन्याने करण्यात आला, त्यानंतर महिला अधिकाऱ्यांच्या विरुद्ध कर्मचाऱ्यांचे पती/पत्नी यांच्यातील एक चैतन्यशील थ्रोबॉल सामना झाला. ज्युनियर आणि सीनियर श्रेणीतील मुलांसाठी, तसेच पुरुष आणि महिलांसाठी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध वयोगटातील सहभागींनी धोरणात्मक कौशल्ये प्रदर्शित करत, प्रेक्षकांना मोहित केले.

31 ऑगस्ट रोजी डॉ. एपीजे अब्दुल कलाम स्टेडियम, एनटीपीसी सोलापूर येथे संमेलनाचे समारोप करताना ग्रामीण क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. एनटीपीसी



सोलापूरच्या उरफ उपक्रमाचा एक भाग म्हणून, या कार्यक्रमात मलप्पा कोनापुरे हायस्कूल, आहेरवाडी येथील मुला- मुलींसाठी व्हॉलीबॉल सामना आणि मुलांसाठी 100 मीटर शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा उद्देश खेळाबद्दल प्रेम वाढवणे आणि तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणे हा आहे.

या समारंभाला तपन कुमार बंदोपाध्याय, एचओपी (सोलापूर), बिपुल कुमार मुखोपाध्याय, जीएम (ओॲंडएम), व्हीएसएन मूर्ती, जीएम (प्रकल्प); नवीन कुमार अरोरा, जीएम (देखभाल); परिमल कुमार मिश्रा, जीएम (ऑपरेशन); आणि मलप्पा कोनापुरे हायस्कूल, क्रीडा परिषद, रएहअ चे प्रतिनिधी आणि कर्मचारी यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मलाप्पा कोनापुरे प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संध्या कुणाळे यांनी एनटीपीसी सोलापूरने विद्यार्थ्यांना दिलेल्या पाठिंब्याबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, तर बंड्योपाध्याय, सीजीएम (सोलापूर) यांनी राष्ट्रीय स्तरावरील खेळांसाठी शारीरिक तंदुरुस्ती, सांघिक कार्य आणि प्रतिभा वाढवण्याच्या महत्त्वावर भर दिला.

कार्यक्रम तरुण सहभागींच्या आवेशाने आणि उत्साहाने चिन्हांकित झाला, उपस्थित प्रत्येकजण त्यांच्या उर्जेने आणि समर्पणाने थक्क झाले. हे उत्सव आरोग्य, एकता आणि राष्ट्रीय अभिमान वाढवण्यासाठी खेळांच्या महत्त्वाची आठवण करून देणारे ठरले. एनटीपीसी सोलापूर येथील राष्ट्रीय क्रीडा दिन हा उत्कंठावर्धक यशस्वी ठरला, जो युवा खेळाडूंना प्रेरणा देणारा आणि समाजातील एकता आणि खिलाडूवृत्तीच्या भावनेला बळ देणारा ठरला.

# महाविकास आघाडीत सोलापूर शहर मध्य सह माकप ला मिळतील किमान 5 जागा

## संगमनेर येथील शासकीय विश्रामगृहात महाविकास आघडी नेत्यांची झाली बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात महायुती सरकार च्या जनता विरोधी कारभाराचा पदार्फाश करण्यासाठी महाविकास आघाडी सर्वाथार्ने सज्ज आहे. सत्ता पिपासू राज्यकर्त्यांनी वाट्टेल त्या योजना जाहीर करून लोकांना दुबळे आणि विकासापासून वंचित ठेवण्याचा डाव शिंदे फडणवीस सरकारने रचलेला आहे. हे पुरोगामी महाराष्ट्राला अधोगती कडे घेऊन जाण्याचे द्योतक आहे.याचा आगामी विधानसभा निवडणुकीत चिरफाड केल्याशिवाय महाविकास आघाडी स्वस्थ बसणार नाही. असा एकमुखी निर्धार संगमनेर येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथील विश्रामगृहात येथे झालेल्या बैठकीत करण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी दिली.

शनिवार दिनांक 31 ऑगस्ट रोजी संगमनेर येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथील विश्रामगृह येथे महाविकास आघाडी आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ यांची जागावाटप बाबत बैठक पार पडली.या शिष्टमंडळात पक्षाचे राज्य सचिव डॉ.उदय नारकर, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, डॉ.डी.एल कराड, डॉ.अजित नवले, ॲड. जायभावे आदींची उपस्थिती होती.

यावेळी 18 व्या लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतील घटक पक्ष या नात्याने महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडी सोबत सर्वत्र जोरदार मेहनत घेतले व भाजपचा पराभव करणे कामी भरीव योगदान दिले. आगामी विधानसभा निवडणुकीत जागा वाटप बैठकीत माकप ला सामावून घेतले जाईल. माकप च्या प्रस्तावावर चर्चा होईल. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांच्यासोबत मी विधी मंडळात काम केलेला आहे.कामगार - शेतकरी आणि सर्वसामान्यांचा हा बुलंद आवाज विधानसभेत पाहिजे.या साठी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातून जिंकतील यासाठी मी स्वतः जातीने लक्ष घालण्याचे सकारात्मक काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी आश्वासन दिले. यावेळी बाळासाहेब थोरात यांनी माजी आमदार नरसय्या



आडम मास्तर यांचा यथोचित जोरदार स्वागत केले.

महाविकास आघाडीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ही अत्यंत महत्त्वाचा घटक पक्ष असून त्यांनी राज्यात सोलापूर - शहर मध्य

ठाणे - डहाणू -तलासरी, विक्रमगड शहापूर, नाशिक - नाशिक पश्चिम, कळवन, दिंडोरी, इगतपुरी

अहमदनगर - अकोले, बीड - माजलगाव, परभणी - पाथरी

नांदेड - किनवट या 12 विधानसभा जागांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली. पर्यायी धोरणे, जाहीरनामा व निवडणूक रणनीती याबाबतही चर्चा झाली. यासंबंधीचे एक निवेदन माकप तर्फे सादर करण्यात आले. 12 विधानसभा जागेवर दावा केला असून सोलापूर शहर मध्य,डहाणू,कळवण, नाशिक पश्चिम, अकोले या तीन जागांवर लवकरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# चित्रकला स्पर्धेत ऑर्किडच्या विद्यार्थ्यांचे यश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह निमित्त झालेल्या चित्रकला स्पर्धेत नागेश करजगी ऑर्किड स्कुलच्या विदयार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत नागेश करजगी ऑर्किड स्कुल मधील एल. के. जी. मधील मनवा बजाज (४ था क्रमांक), यु. के. जी. मधील सांजल पुकाळे (५ वा क्रमांक) तर २ री मधील शिवान्य दुधाळ (२ रा क्रमांक) व मिहिका पुकाळे (उत्तेजनार्थ) यांनी यश मिळविले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी, सचिवा वर्षाताई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, प्री.प्रायमरी इन्चार्ज अनिता अनगोंडा यांनी अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना कला शिक्षक सिद्धाराम नालवार, सरिता जतकर, निलेश साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.



# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा कार्यक्रम दिनांक 14 सप्टेंबर 2024 रोजी नियोजित आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांना जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रत्येक शासकीय यंत्रणेने हा सोहळा यशस्वी होण्यासाठी केलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

नियोजन भवन येथे आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. संजीव ठाकूर, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, प्रांताधिकारी-1 सदाशिव पडदुणे, उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन




अधिकारी संतोष देशमुख, अधिक्षक अभियंता संजय माळी, सोलापूर मनपा उपायुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख दादासाहेब घोडके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्यासह अन्य सर्व संबंधित विभागाचे प्रमुख उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन द्वारे बैठकीत सहभागी झालेले होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी बैठकीत बांधकाम विभागाकडून कार्यक्रम स्थळावर करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती जाणून घेतली. तसेच पार्कींग, वीज पाणी, साफसफाई याबाबतची महापालिकेकडून माहिती घेतली व आवश्यक सूचना दिल्या. सर्व विभागांनी सोपविलेली कामे वेळेत पूर्ण करावीत. कार्यक्रम स्थळी शासकीय विभागांनी समन्वय ठेवून नियोजनबध्द काम करावे. पोलीस विभागाने कार्यक्रमाच्या दिवशी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे करावे. वाहतुकीस कोठेही अडथळा निर्माण होणार नाही या अनुषंगाने पार्किंगची व्यवस्था ठेवावी. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी महिला लाभार्थी घेऊन येणे व मेळावा झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी सोडणे यासाठी आवश्यक असलेल्या 400 बसेसची पूर्तता करावी. पुरवठा विभागाने लाभार्थ्यांसाठी जेवणाची उत्कृष्ट व्यवस्था करण्याबरोबरच पाणी कुठेही कमी पडणार नाही याची ही दक्षता घ्यावी, असे त्यांनी सुचित केले. या कार्यक्रमासाठी 30 ते 40 हजार महिला लाभार्थी येण्याचे नियोजन करण्यात येत असून त्या अनुषंगाने कार्यक्रमच्या ठिकाणी हिरकणी कक्ष स्थापन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.